महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०५
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ७१२ दिनांक ०४ / ०८ / २०२६

**विषय:** शिकाऊ उमेदवारांना देय असलेल्या विद्यावेतनाच्या दरांमध्ये शासनाच्या धर्तीवर सुधारणा करणे व तद्अनुषंगीक सुधारीत सूचना अंगिकृत करणेबाबत.

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र.५९६ दि.०३.१२.२०१९.
२) परिपत्रक क्र.मासंवि/सेप्र/न.क्र.२१२/११२३२ दि.१८.०५.२०१८.

*****

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार केंद्र शासनाने शिकाऊ उमेदवार नियम, १९९२ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या नियुक्तीसाठी विविध योजना प्रसृत केल्या आहेत. या अनुषंगाने भारत सरकार राजपत्र तथा अधिसूचना क्र.GSR ६८६(अ) दि.२५.०९.२०१९ च्या धर्तीवर कंपनीमध्ये नियुक्त शिकाऊ उमेदवार यांच्या विद्यावेतनाचे दर प्रशासकीय परिपत्रक क्र.५९६ दि.०३.१२.२०१९ अन्वये सुधारीत करण्यात आलेले आहेत. तसेच सदर सुधारीत दर दि.२५.०९.२०१९ पासून लागू करण्यात आले आहेत.

२. राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना (NAPS) २.० अंतर्गत शिकाऊ उमेदवारांना अदा करण्यात येत असलेल्या विद्यावेतनाच्या २५% किंवा रु.१५००/- प्रतिमाह यापैकी जी रक्कम कमी असेल इतक्या रक्कमेच्या प्रतिपूर्तीची मागणी परिपत्रक क्र.मासंवि/सेप्र/न.क्र.२१२/११२३२ दि.१८.०५.२०१८ अन्वये कंपनीकडून करण्यात येत होती. तथापि, राष्ट्रीय कौशल्य विकास व उद्यमशिलता मंत्रालयाने दि.१२.०७.२०२३ रोजी पारीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे व महाराष्ट्र राज्य व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने पत्र क्र.१०/ATS/२०२३/प्र.क्र.५/१९४ दि.२७.०७.२०२३ अनुसार सदरची प्रतिपूर्ती दि.०१.०७.२०२३ पासून देय ठरत नाही.

३. महाराष्ट्र राज्य व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या उपरोक्त दि.२७.०७.२०२३ च्या सूचनांनुसार केंद्र व राज्य शासनातील विभाग तसेच सावर्जनिक क्षेत्रातील उपक्रम यांना राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना (NAPS) अंतर्गत निधीचे सहाय्य उपलब्ध होणार नसल्याने अशा आस्थापनांचे दि.०१.०७.२०२३ नंतरचे सर्व करार हे Non DBT (Non Direct Benefit Transfer) स्वरुपाचे ठरविण्यात आले आहेत. यास्तव कंपनी अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या शिकाऊ उमेदवारांना कंपनीकडूनच संपूर्ण विद्यावेतन अदा करावे लागणार आहे. तसेच त्याबाबतची मासिक प्रतिपूर्ती (जास्तीतजास्त रू.१५००/- प्रति उमेदवार) देय ठरणार नाही.

४. आता, भारत सरकार, कौशल्य विकास व उद्यमशिलता मंत्रालयाचे राजपत्र तथा अधिसूचना क्र.GSR ६१०(अ) दि.०३.०९.२०२५ अन्वये शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनाच्या दरामध्ये दि.११.०९.२०२५ पासून वाढ करण्यात आलेली आहे. भारत सरकारच्या दि.०३.०९.२०२५ रोजीच्या राजपत्राच्या धर्तीवर कंपनीच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या अभ्यासक्रमातील अथवा प्रवर्गातील शिकाऊ उमेदवारांना अदा करावयाच्या विद्यावेतनाचे दर खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार सुधारीत करण्याकरीता सक्षम अधिकारी यांनी मंजुरी प्रदान केली आहे.

क)  विद्यावेतनाचे सुधारीत दर

| अक्र. | अभ्यासक्रम तथा प्रवर्ग | विद्यावेतनाचे सध्याचे दर | विद्यावेतनाचे सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना (NAPS) मधील अभ्यासक्रम** | | | |
| १. | राष्ट्रीय किंवा राज्य प्रमाणपत्रधारक **(ITI तारतंत्री/विजतंत्री)** | रू. ७,०००/- प्रतिमाह | रू. ९,६००/- प्रतिमाह |
| **राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण योजना (NATS) मधील अभ्यासक्रम** | | | |
| १. | तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवार किंवा व्यावसायिक प्रमाणपत्रधारक किंवा सॅण्डविच कोर्स (पदवी संस्थामधील विद्यार्थी) **(एचएससी (लेखांकन व लेखा परीक्षण/ कार्यालय व्यवस्थापन/लघूलेखन))** | रू. ७,०००/- प्रतिमाह | रू. ९,६००/- प्रतिमाह |
| २. | तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवार किंवा कोणत्याही शाखेतील पदविकाधारक किंवा सॅण्डविच कोर्स (पदवी संस्थामधील विद्यार्थी) **(पदवीका धारक अभियंता (इलेक्ट्रीकल))** | रू. ८,०००/- प्रतिमाह | रू. १०,९००/- प्रतिमाह |
| ३. | पदवीधर शिकाऊ उमेदवार किंवा पदवी शिकाऊ उमेदवार किंवा कोणत्याही शाखेतील पदवी **(पदवीधर अभियंता (इलेक्ट्रीकल))** | रू. ९,०००/- प्रतिमाह | रू. १२,३००/- प्रतिमाह |

ख)  राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना (NAPS) मधील राष्ट्रीय किंवा राज्य प्रमाणपत्रधारक (आयटीआय तारतंत्री/विजतंत्री) या अभ्यासक्रमाकरीता नियुक्त झालेल्या शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनाचे सुधारीत दर दि.११.०९.२०२५ पासून लागू राहतील. तसेच या योजनेंतर्गत देय असलेली मासिक प्रतिपूर्ती (रु.१५००/-) दि.०१.०७.२०२३ पासून बंद करण्यात आली असून तत्पूर्वीच्या प्रलंबित प्रतिपूर्ती प्रकरणांबाबत संबंधित कार्यालयात पाठपुरावा करण्यात यावा.

ग)  शिक्षु प्रशिक्षण मंडल (पश्चिमी क्षेत्र), मुंबई यांचे परिपत्रक क्र.BOAT WR/२०२६/५२९ दि.१३.०५.२०२६ अनुसार राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण योजनेतील (NATS) शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनाचे सुधारीत दर दि.०१.०४.२०२६ पासून लागू राहतील. या अनुषंगाने विद्यावेतनाच्या सुधारीत दराच्या ५०% रक्कम शिकाऊ उमेदवाराच्या खात्यावर वर्ग करण्यात यावी.

घ) राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना (NAPS) व राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण योजना (NATS) योजनेंतर्गत केवळ कंपनीच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या म्हणजेच (१)आयटीआय (तारतंत्री/विजतंत्री) (२)एचएससी (लेखांकन व लेखा परीक्षण/कार्यालय व्यवस्थापन/लघूलेखन) (३)पदवीका धारक अभियंता (इलेक्ट्रीकल) (४)पदवीधर अभियंता (इलेक्ट्रीकल) याच अभ्यासक्रमातील अथवा प्रवर्गातील शिकाऊ उमेदवार नियुक्त करण्यात यावेत.

च) शिकाऊ उमेदवार नियम, १९९२ मधील तरतुदींनुसार संबंधित क्षेत्रिय कार्यालयांतर्गत उपरोक्त प्रवर्गातील मंजूर असणाऱ्या पदांच्या केवळ ५% शिकाऊ उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी.

छ) शिकाऊ उमेदवार नियुक्त करतांना शिकाऊ उमेदवार नियम, १९९२ मधील वेळोवेळी निर्गमित केलेल्या सामाजिक आरक्षणाच्या तरतुदी लागू राहतील.

ज) क्षेत्रिय कार्यालयांतर्गत नियुक्त होणाऱ्या शिकाऊ उमेदवारांकरीता संबंधित मंडलाचे अधीक्षक अभियंता हे नोडल ऑफीसर म्हणून काम पाहतील.

झ) शिकाऊ उमेदवार हे केवळ कामाचे ज्ञान व माहिती मिळावी या उद्देशाने नियुक्त करण्यात येत असल्याने त्यांना कोणतेही काम प्रत्यक्ष किंवा स्वतंत्रपणे करण्याबाबतची परवानगी देण्यास मनाई करण्यात यावी. शिकाऊ उमेदवारीच्या कालावधी दरम्यान अशा शिकाऊ उमेदवारांसोबत कंपनीचा नियमित कर्मचारी असणे आवश्यक आहे जेणेकरुन त्यांना काम समजावणे व कामामध्ये सहाय्य करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे तांत्रिक संवर्गातील तंत्रज्ञ पदांवरील शिकाऊ उमेदवार यांना विद्युत खांबावर चढणे, चालू विद्युत वाहिनीची निगा व तारमार्गावरील दुरूस्तीची कामे इत्यादी व अशी जिवीताला धोका असलेली कामे देण्यात येऊ नयेत.

५. सबब, क्षेत्रीय कार्यालयातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, शिकाऊ उमेदवार यांना शासनाच्या धर्तीवर सुधारीत दराने विद्यावेतन थकबाकीसह अदा करण्यात यावे. तसेच शिकाऊ उमेदवार नियुक्त करत असतांना उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

६. उपरोक्त सूचना प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून व विद्यावेतनाचे सुधारीत दर परिच्छेद क्र.४ मधील (ख) व (ग) मध्ये नमूद केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रति,**

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.